## प्रेस नोट
## पर्यावरण विभाग, पुणे महानगरपालिका

राज्यातील अनेक शहरांमध्ये पी.एम २.५ आणि पी. एम. १० या धुलीकणांमुळे वायू प्रदूषण वाढत असल्याने राज्य सरकारकडून मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, यांच्या दि.२/११/२०२३ रोजी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, कलम ५ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी सेन्सर-आधारित वायू गुणवत्ता तपासणीसाठी प्रणाली उभारणे आवश्यक आहे. प्रदूषणाची पातळी निर्देशित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होते तेव्हा त्यास नियंत्रित करण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या पर्यावरण विभाग व बांधकाम परवाना विभाग आणि डब्ल्यू.आर.आय. इंडिया (WRI India) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी सेन्सर-आधारित वायू गुणवत्ता तपासणी प्रणाली कार्यन्वित करण्याकरिता चर्चा करण्यासाठी क्रेडाई (CREDAI), मराठी बांधकाम व्यावसायिक, नारेडको आणि सेन्सर उत्पादक बांधकामस्थळांवरील सेन्सरआधारित वायूगुणवत्ता परीक्षण व केंद्रीकृत मॉनिटरिंग डॅशबोर्ड विकसित करण्याबाबत मा. श्री नवल किशोर राम, आयुक्त पुणे महानगरपालिका यांचे निर्देशानुसार मा. श्री पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) यांचे अध्यक्षतेखाली सदर बैठक आयोजित करण्यात आली होती.

सेन्सर आधारीत वायू गुणवत्ता तपासणी प्रणाली प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व संबंधितांच्या सूचना व शिफारसींचा समावेश करण्यासाठी Task Force Committee स्थापन करून बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी सेन्सर-आधारित वायू गुणवत्ता तपासणीसाठी प्रणाली उभारून केंद्रीकृत डॅशबोर्डशी एकत्रित करण्याच्या सूचना दिल्या होत्या त्याअनुषंगाने Task Force Committee ची पहिली बैठक दि. २९.०९.२०२५ रोजी मा. श्री रवि पवार, उप आयुक्त पर्यावरण विभाग यांचे अध्यक्षतेखाली पार पडली.

सर्व संबंधितांशी झालेल्या चर्चेनंतर पुणे महानगरपालिकेमार्फत सदर बैठकीत असा निर्णय घेण्यात आला कि, प्रस्तावित सर्व सेन्सर उपकरणांची Co-location Study भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेत (IITM), पाषाण, पुणे येथे केली जाईल. बांधकाम स्थळांवरील हवा गुणवत्ता तपासणी करण्यासाठी सर्व सेन्सर उत्पादकानी त्यांचे सेन्सरचे IITM संस्थेकडून calibration करून घेणे अनिवार्य आहे. ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास त्या सेन्सर उत्पादक कंपनीस पुढील निवड प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल. इतर उपकरणे किंवा मॉडेल्स पुणे महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाची पूर्वसंमती मिळाल्यास आणि निर्धारित तांत्रिक निकषांची पूर्तता झाल्यासच पडताळणीसाठी विचारात घेतली जातील. पुढील सूचनांद्वारे आवश्यकतेनुसार अन्य सेन्सर उत्पादक कंपनीस कळविण्यात येईल.

(रवि पवार)
उप आयुक्त पर्यावरण विभाग
पुणे महानगरपालिका